GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 9 | MARCH – 2017

जागतिकीकरण व भारतीय शेतीवरील परिणाम

खडके मेघनाथ बाबुराव
सामाजिकशास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

प्रस्तावना

आज आपणविकासाचा मोठा टप्पा पुर्णकेला असला तरीदेशाची जवळपास ६० ते ६५ प्रतिशत लोकसंख्या आजही उत्पन्न व रोजगाराचे प्रमुख साधन म्हणून कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्याविकासाचा पाया व विकासाचीदिशा शेतीनेचदाखवली. आज देशात ६५ कोटी लोकसंख्या ही शेतकरी आहे, तर युरोपात ४५ लाख व अमेरीकेत १५ ते २० लाख शेतकरी आहेत. अमेरिका आजही एकतृतीयांश जगाला अन्नधान्यनिर्यातकरते पण आपणतिला कृषीप्रधान म्हणत नाही. कारणतिची केवळ ४ ते ५ प्रतिशत लोकसंख्या शेतीमध्येगुंतलेली आहे. मानवाच्या अन्नाच्या प्राथमिकगरजेची पूर्ततातसेच उद्योगाचा पाया कृषीवर आधारलेला आहे. शेतीमधून उद्योगासाठीकच्चा माल, मजूर व बाजारपेठ मिळते. भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार म्हणून स्वातंत्र्योत्तरकाळापासून शेतीकडे पाहिले जाते.

देशात १९७० च्या दशकात कृषीवर अधिक भरदिल्याने हरितक्रांती घडून येऊन, देश अन्नधान्याबाबत स्वावलंबी झाला व अन्नधान्य मोठ्या प्रमाणातनिर्यातकरण्यात येऊ लागले तेव्हापासून शेतीमध्ये बदलास सुरुवात झाली. शेती १९९० पर्यंत समृध्द होती. १९९० च्या काळात देशात आर्थिक अस्थिरतानिर्माण झाली.जागतिक पातळीवर १९९० मध्येजागतिकीकरणाचे वारे वाहू लागले, अशा परिस्थितीमध्येदेशातनिर्माणझालेल्या आर्थिक संकटातून अर्थव्यवस्थेला बाहेर पडणेगरजेचे होते. देशाला आर्थिक संकटातून बाहेर

पडूनविकासाची सुरूवातकरण्यासाठी परकीयकर्जाची, मदतीचीगरज होती. त्यासाठीजागतिक बँक व आंतरराष्ट्रीयनाणेनिधी या संघटनांनी आपल्या काही अटींसह मदतकेली, त्या अटी म्हणजे भारतातजागतिकीकरणाची सुरूवातकरणे. यानुसार १९९१ च्या नवीन आर्थिकधोरणातजागतिकीकरणाचा स्वीकारकरण्यात आला. १९९५ ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाल्यानंतरजागतिक अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राबाबत वादळ उठलेत्यातून शेतीकरार झाला व कृषीक्षेत्रावरील सर्व बंधनेकाढण्यात आली. त्यानंतर कृषीमध्ये मोठ्या प्रमाणातजागतिकीकरणघडून आले. जागतिकीकरणाचादेशाच्या अर्थव्यवस्थेतील सर्व घटकात बदलघडून आला आहे. याला कृषी क्षेत्रही अपवाद राहिले नाही. जागतिकीकरणामुळे भारतातील अविकसीत असलेल्या कृषी क्षेत्रावर परिणाम मोठ्या प्रमाणातझालेला आहे.

संशोधनाचे उद्देश

१.जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
२.जागतिकीकरणामुळे कृषी क्षेत्रावरझालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
३.जागतिकीकरणा संकल्पना समजूनघेणे.

संशोधनाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण माहिती प्राप्तकरण्यासाठीदुय्यम सामग्रीचा वापरकेला आहे. शेती, जागतिकीकरणामुळे शेतीमध्येझालेला बदल याविषयीविविध पुस्तके, ग्रंथ, मासिके, पंचायतराजचे रेकॉर्ड, विविध अहवाल, तंज्ञाची मते, लेख, इंटरनेट इत्यादी सामग्रीच्या साह्याने दुय्यम माहिती प्राप्तकरण्यात आली आहे.

जागतिकीकरणाची व्याख्या :

आंतरराष्ट्रीयनाणेनिधीच्या व्याख्येनुसार 'जागतिककीकरण म्हणजे वस्तु, सेवा आणि आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह, अतिजलद व प्रसरण पावणारेतंत्रज्ञान यांचे वाढते प्रमाणतसेचविविधता यांच्या साह्याने जगातीलदेशांचे सतत वाढतजाणारे परस्परावलंबित्व होय'

जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम

खुल्या बाजारपेठा

देशातील उत्पादन खर्च व आयातकोटा, आयातकेल्या जाणाऱ्या वस्तुच्याकिंमती यातीलतफावत आयात शुल्काच्या साह्याने दूरकरता येते. पण खुल्या बाजारपेठेच्यातत्वानुसार आयातशुल्ककमीकरण्याचे बंधनघालण्यात आले. विकसित देशांनी सहा वर्षात ३६ प्रतिशत व प्रत्येक वस्तुसाठी १५

प्रतिशतजकाती कमी करणे तर विकसनशील देशांनी दहा वर्षात २४ प्रतिशत व प्रत्येक वस्तुसाठी १० प्रतिशतजकातीकमीकरावे व अविकसितदेशांनी कोणतीही जकातकमीकरण्याची आवश्यकता नाही. या प्रक्रियेच्या शेवटीजकातकमीकेलेलीजकात शुल्काचेदर वाढवायचे नाही. ज्या देशांनीजकातीचेदरकमीकेले आहेत, त्यांनाकलम ३६ नुसार विशेष संरक्षणदेण्यात आले. जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी करारानुसार भारतानेदेशाची बाजारपेठ मुक्त केली. भारत सरकारने १४३० वस्तु वरील व्यापार विषयक सर्व बंधने हटवली.

जागतिकीकरण व कृषी व्यापार

आज कृषी क्षेत्रातनवीनतंत्रज्ञानाचा वापरकरुन संपूर्णजगभर कृषीमालाचा व्यापारकरण्याचीक्षमता भारतानेनिर्माणकेली आहे. जागतिक बाजारपेठेतजागतिक खुल्या आर्थिक धोरणामुळे कृषी व्यापाराच्याकक्षा वाढल्या त्याच बरोबर स्पर्धाही वाढली. भारतातून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात निर्यात होणाऱ्या कृषीमालाची जागा अलिकडील पंधरा वर्षात फळे, पालेभाज्या, बागायती पिके, फुले या पिकांनीघेतली आहे. याशिवाय मांस, मासे, मसाल्याचे पदार्थ, तंबाखू, चहा, कॉफी, साखर, तीळ, एंरडीतेल, खाद्यतेल, काजू, बटाटे यांचीही निर्यात मोठ्या प्रमाणत होते. देशातीलएकूणनिर्यातीमध्ये कृषी व इतर संबंधीत मालाच्या निर्यातीचा वाटा १० प्रतिशत आढळतो. देशातजागतिकीकरणापुर्वी कृषी आयातकमी होती पणजागतिकीकरणानंतरखाद्यतेल, नवीन संकरीतबियाणे, नवीन आधुनिकतंत्रज्ञान यांची आयातीत मोठी वाढ झाली. भारतातखाद्यतलाचातुटवडाजाणवल्याने सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल यांचा पर्याय शोधण्यात आला. यामुळे आयातकमी झाली असली तरी सद्याही देशातखाद्यतेल व नविन आधुनिकतंत्रज्ञान, उच्च प्रतिचेबियाणे आयाततसेचजागतिक व्यापार संघटनेच्या कृषी करारानुसारकरावे लागतात.

राष्ट्रीयनिर्यात-आयातमध्ये कृषी निर्यात-आयात प्रमाणदर्शवणारी सारणी.
(१९९५ त २०१०) कोटी मध्ये.

वर्ष	एकूणनिर्यातीत कृषी निर्यातीचे प्रमाण	एकूण आयातीत कृषी आयातीचे प्रमाण
१९९०-९१	१८.४९	२.७९
१९९५-९६	१९.१८	४.८०
२०००-०१	१४.२३	५.२९
२००४-०५	११.०८	३.४
२००९-१०	९.७	२.९

संदर्भ - १). www.icrier.org/pdf/wp.p.22,77

वरील सारणीवरुन असेस्पष्ट होते की, जागतिकीकरणाच्या सुरुवातीपासूननिर्यातीचे प्रमाण घटत आहे. तरजागतिकीकरणाच्या सुरुवातीपासूनदेशातील कृषी आयात ही अस्थिर स्वरुपाची बनली आहे. थोडक्यातदेशाच्या कृषी व्यापारावरजागतिकीकरणाचा प्रतिकुल परिणाम होत आहे.

जागतिकीकरण व देशातील अन्न सुरक्षितता

भारतात अन्नसुरक्षाविधेयक २०११ मध्ये संसदेत मांडण्यात आले व त्याचवर्षी संप्टेंबर महिन्या त्याला मंजुरीदेण्यात आली. त्यानंतरकायद्यात रुपांतरझले. संयुक्त राष्ट्रसंघकायदा १९९९ मध्ये मानवाच्या अन्नासाठीचा मुलभूत अधिकारत्याला मिळवण्याविषयी अनेकतरतुदीकरण्यात आल्या आहेत. बाली येथेझालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या बैठकीत अन्नसुरक्षिततेबाबतघेतलेल्या भुमिकेवरविकसितदेशांनी टिकाकेली व त्यालाविरोधकेला. जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी करारातीलतरतुदीत १९८६-८७ च्या अन्नधान्यांच्याकिंमती आधारभुत मानल्या आहेत त्यानुसार अनुदानाचे प्रमाण ठरले पण २०१३ च्या अन्नसुरक्षाकायद्यासाठी अन्नधान्याच्याकिंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत त्यामुळे १९८६-८७ च्या किंमतीनुसार अनुदानदेणे परवडत नाही. मात्र अन्नसुरक्षेवरगदा येऊ नये यासाठीजागतिक व्यापार संघटनेच्या कृषी कराराच्याविरोधातघेतलेली भूमिका योग्य ठरली. कृषी अनुदानाच्या मर्यादा या चालु किंमतीनुसार मोजण्यात याव्या अशी भारताने मागणीकेली. सध्यस्थितीत अमेरिका सुमारे १२० अब्ज डॉलर कृषी अनुदानदेतेतर भारतात १२ अब्ज डॉलर कृषी अनुदानदेण्यात येते. जागतिक पातळीवरील पेचामुळे भारताच्या अन्नसुरक्षेवर मर्यादा पडत आहेत.

जागतिककीकरण व विशेष आर्थिकक्षेत्र (सेझ)

स्वातंत्र्य काळानंतर देशाच्या आर्थिकविकासासाठी सरकारनेकेलेले प्रयत्नअपुरे पडल्यावरकेंद्र सरकारनेदेशातील उद्योगांनानवीदिशादेण्यासाठीचीनच्याधरतीवर २००६ मध्ये विशेष आर्थिकक्षेत्रकायदा संमतकरुनदेशात सेझला सुरुवातकेली. सेझ हा एक भौगोलिक प्रदेश असूनत्याचे आर्थिककायदे हे देशाच्या वैशिष्ट्यपुर्ण आर्थिककायद्यापेक्षाशिथिल असतात.आर्थिकदेशात विशेष आर्थिकक्षेत्र (सेझ) अंतर्गत उभारणाऱ्या उद्योगांना उत्पन्नकरात सवलती, विदेशी बँका स्थापन्यास परवानगी, परकियगुंतवणूकीस परवानगी, औद्योगीकनगर म्हणून घोषीत, कंपनीकायदे, पर्यावरणीकायद्यातून सवलत, विद्युत व पाणी पुरवठा, व स्थानिककरातून मुक्तता अशा प्रकारच्या अनेक सवलतीदेण्यात आल्या आहे. पण याचा फायदा अनेकदेशी-विदेशीकंपन्यानी भुसंपादानासाठीकेला. सेझमुळे देशातील सुपीक व कृषीसाठी पोषक

असणारीजमीन उद्योगासाठी वापरण्याची स्पर्धानिर्माण झाली. संपादीतकेलेल्या जमीनीला योग्यकिंमत मिळणार नाही, छोट्या शेतकऱ्याचे उपजिविकेचे साधन जाईल, शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे स्थलांतर वाढेल, त्यातुन केवळ मुठभर उद्योजकांनाच फायदा होईल इतर सर्वसामान्यजनतेला शेतजमीनगमवण्याशिवायकोणाताच पर्याय राहणार नाही. त्यातूनदेशात प्रादेशिक, आर्थिक व सामाजिक विषमता वाढेल.

जागतिकीकरण व शेतकऱ्यांच्या आत्महत्या

भारतात मागील दहा-पंधरा वर्षापासुनविविध राज्यात शेतकरी आत्महत्या करत आहेत व ही आज देशासमोरीलएकगंभीर समस्या निर्माण झाली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी करारानुसार व्यापारावरील बंधंनेकमी झाली, अर्थव्यवस्था, बाजारपेठ मुक्त झाली, सर्व प्रकारच्या सबसिडी, अनुदानात मोठीकपात झाली एकंदरीत कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदलकरावा लागला. जागतिकीकरणाचा सर्वातजास्त फटकादेशातील लहान शेतकऱ्यांना झाला. करण भारतामध्ये लहान शेतकऱ्यांचे प्रमाण ६० प्रतिशत आहे.मध्यम शेतकऱ्यांचे प्रमाण ३० प्रतिशत आहे व मोठ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १० प्रतिशत आहे.कृषीला दिलेजाणारे अनुदानकपातकेल्यामुळे कृषी अवजारे, बियाणे, रासायनिकखते, नवतंत्रज्ञान, यांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढल्या व जागतिक स्पर्धेमुळे शेतमालासकमी भाव यातून कृषी व उदरनिर्वाह करण्यासाठी शेतकरीकर्ज बाजारी बनला. देशात शेतमालाला रास्त भाव, कृषी उत्पादकता वाढवावी, शेतीसाठीच्या अनुदानात वाढकरावी, कृषी मालाचा व्यापार संरक्षणात्मककरावा, पेटंटपासूनसंरक्षण, निर्यातीस प्रोत्साहन, समुह शेतीस प्रोत्साहन, शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण यातुन कृषीला नवसंजिवनीदेवूनदेशातील शेती व शेतकरी टिकवला पाहिजे.

सदर्भ :

१. चि.मो.पंडित, शेती काही सामाजिक काही आर्थिक काही तांत्रिक, आजचा सुधारक मासिक, जानेवारी २००२,पृ. २८१
२. डॉ. अनिल सुर्यवंशी, स्वातंत्र्याची ६५ वर्षे क्षेत्रीयविकास, योजना मासिक, ऑगस्ट २०१२, पृ.४१
३. डॉ. रामचद्रभिसे, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काळात शेतीची वाटचाल, योजना मासिक, ऑगस्ट २०१२, पृ. ४९
४. डॉ. जी.एन.झामरे, आतंरराष्ट्रीय व्यापार व वित्त, पिंपळापुरे ॲन्ड कं पब्लिशर्स नागपुर, जुन २००६ पृ. ४२९
५. डॉ. सुखदेवखंदारे, भारतीय अर्थव्यवस्था, एज्युकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद, जून २०१३, पृ.क्र. ४८५
६. डॉ. एन.एन. मुढे, जागतिक व्यापार संघटना आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, योजना मासिक, ॲगस्ट २००६, पृ.क्र. ५६
७. डॉ. शामराव वायसे, जागतिक व्यापारात भारतीय कृषीची बदलती भूमिका, रिसर्चलिंक,ॲनइंन्टरनॅशनल जर्नल-१०६, मे २०१४, पृ.क्र. १४९
८ शेटेजगदीस, जागतिकीकरण उदारीकरण शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि उत्पादन मूल्य, वेलसेट बुक सेलर्स अँड पब्लिशर्स, पुणे.
९. बनसोडे प्रशांत, जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८